# आम्हांला भीती व लाज वाटते तेव्हा देव आमचे साहाय्य करतो

या अभ्यासातून प्रत्येक मुलाला प्रभूमध्ये 4 शांती व सुरक्षितता लाभावी अशी विनंती त्याला करा.

**तयारी:** मुलांना लिहिता येईल असे काही गुळगुळीत दगड जमा करा.



मुलांनी हे चित्र रंगवावे.

1 शमुवेल 17:20-51 मधून दावीद व गल्याथ ह्यांचा वृत्तांत वाचून दाखवा किंवा सांगा. शक्य असल्यास एका मोठ्या मुलाला हा वृत्तांत इतरांसाठी वाचण्यास सांगा. देवाचे सामर्थ्य भीती व लाज यावर कशी मात करते याविषयी मुलांना प्रश्न विचारा:

- दावीदाचे मोठे भाऊ लढाईवर गेले होते तेव्हा दावीद काय करीत होता?
- दावीद आपल्या वडिलांची मेंढरे राखता राखता काय शिकला?
- दावीद युध्दभूमीवर आला तेव्हा दावीदाच्या मोठ्या भावाने कोणती तक्रार केली?
- दावीदाने लढाईसाठी जाताना शौलाची शस्त्रसामग्री नेण्यास नकार का दिला?
- दावीद राक्षस, गल्याथाच्या विरोधात लढण्यास गेला तेव्हा त्याला कोणी सामर्थ्य पुरविले?
- लोकांना घाबरवून टाकणाऱ्या राक्षसाला ठार मारण्यास देवाने एका तरुण मुलाला कसे साहाय्य केले?



**कार्यकृती:** आपल्याला वाटणाऱ्या भीतीचा पराभव करणे.

- एका मोठ्या कागदावर लोकांना कोणत्या गोष्टींविषयी भीती वाटते ते लिहा. मुले त्यांना कशाकशाचे भय वाटते ते सांगतील.
- मोठ्या मुलांना देवाचे वर्णन करणारे शब्द दगडांवर लिहिण्यास सांगा. देवाविषयी सांगणाऱ्या शब्दांचा उल्लेख सर्व मुलांना करण्यास सांगा. **काही उदाहरणे:** "सामर्थ्यशाली" "सर्वज्ञानी" "माझ्यावर प्रीती करतो" "सर्वत्र आहे" आणि "मला तारतो" मुलांना कागदावर लिहिलेल्या भीती वाटणाऱ्या गोष्टींवर हे दगड मारण्यास सांगा यासाठी तुम्हांला मुलांना बाहेर घेऊन जाता येईल.

**विचार करा:** देवाचे सामर्थ्य दुर्बल लोकांचे रक्षण करते याची आठवण आम्हांला दगड करून देतात. दाविदाने गल्याथाच्या दिशेने फेकलले दगड लहान असले तरी देवाने त्यांना सामर्थ्यवान केले.



सर्वसमर्थाच्या पंखाखाली आश्रय. चार मुलांना स्तोत्र 71 मधील चार भाग वाचण्यास सांगण्यास किंवा गाण्यास सांगा (वचने 1,2,4,5,6,7,11,12).

जो परात्पराच्या गुप्त स्थळी वसतो.

तो सर्वसमर्थाच्या सावलीत राहील.

परमेश्वराला मी माझा आश्रय माझा दुर्ग असे म्हणतो,

तोच माझा देव त्याच्यावर मी भाव ठेवितो

तो तुझ्यावर पाखर घालील त्याच्या पखांखाली तुला आश्रय मिळेल.

त्याचे सत्य तुला ढाल व कवच आहे.

रात्रीच्या समयीचे भय

दिवसा सुटणारा बाण

कोळोखात फिरणारी मरी भर दुपारी नाश करणारी पटकी,

ह्यांची तुला भीती वाटणार नाही.

तुझ्या बाजुस सहस्रावधी पडले, तुझ्या उजव्या हातास लक्षावधी पडले, तरी ती तुला भिडणार नाही,

कारण तुझ्या सर्व मार्गात तुझे रक्षण करण्याची

तुझ्याविषयी तो आपल्या दिव्यदूतांना आज्ञा देईल.

तुझ्या पायांना धोंड्याची ठेच लागू नये म्हणून ते तुला आपल्या हातांवर झेलून धरितील.

**1 शमुवेल 17:1-51** ह्या शास्त्रभागातून दावीद आणि गल्याथ ह्यांच्या वृत्तांताचे नाट्यीकरण करा.

- हे नाट्यीकरण मुलांना प्रौढांसमोर सादर करता यावे याकरिता उपासनेच्या पुढाऱ्याशी चर्चा करून व्यवस्था करा.
- वेळ कमी असल्यास कथा वृत्तांतातील कमी महत्वाचे भाग वगळा.
- काही मुलांनी पलिष्टी लोक म्हणून अभिनय करायचा तर इतरांनी इस्राएलाचे सैनिक व्हायचे. मुलांची संख्या पुरेशी नसेल तर प्रौढांची मदत घ्या.
- सर्व भूमिका उत्तम पार पडेपर्यंत प्रत्येकाकडून तालीम करून घ्या.

**निवेदक:** कथा वृत्तांताचे निवेदन करता करता पवित्र शास्त्रातील त्या व्यक्ति रेखे पाशी आल्यावर अभिनय करणारे त्या त्या व्यक्तीचे संवाद म्हणून अभिनय करतील.

**निवेदक:** वृत्तांतातील न बोललेला भाग वाचून दाखवा आणि अभिनय करणाऱ्यांना ते करून दाखविण्यासाठी थांबा. दोन मुलांना इशाय आणि राजा म्हणून उभे करा.

**गल्याथ:** भाला म्हणून हातात एक काठी घ्या आणि मोठमोठ्याने संतापून आरडा ओरडा करा.

**दावीद:** गोफणीने मारत असल्याचा अभिनय करा. गोफण म्हणजे एक चामड्याची पिशवी असे त्यात दगड ठेवता येत असे आणि बाजूला दोऱ्या बांधलेल्या असत. गोफण वापरणारे त्यात दगड ठेवून आपल्या डोक्यावर गरगर फिरवीत आणि दोन पैकी एक दोर सैल केला की दगड नेमका लक्ष्यावर (target)जाऊन पडे.

**प्रार्थना:** "हे सर्वसमर्थ स्वर्गीय देवा आम्हांला सर्वांना आपआपल्या भयांवर मात करण्यास साहाय्य कर.

Copyright 2003 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net